## 'रक्षा बंधन – सुरक्षाबंधन सोहळा'

## रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती करण्याचा जिल्हा पोलीस दलाचा एक अनोखा उपक्रम–

जा.क्र. ५६०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–०७/०८/२०१६

भंडारा :– भंडारा जिल्हा पोलीस दलातर्फे सर्वसामान्य जनतेच्या सुरक्षेकरीता जे विविध प्रकारचे नाविन्यपुर्ण उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग असलेला ' रक्षारबंधन – सुरक्षा ' हा रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती करण्याचा उपक्रम गतवर्षी प्रमाणेच यावर्षी देखील मा. पोलीस अधीक्षक भंडारा श्रीमती विनीता साहु मॅडम यांचे उपस्थितीत आज रोजी ११.०० वा. त्रिमुर्ती चौक, भंडारा येथे मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमास जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहु, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती रश्मि नांदेडकर, पोलीस उपअधीक्षक (गृह) श्री. कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधीकारी भंडारा श्री. जोगदंड हे मान्यवर व मुख्यालयातील अधीकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सुत्र संचालन क्रिएटिव्ह माईण्डस, भंडारा या सामाजीक क्षेत्राात कार्यरत असणाऱ्या संस्थेच्या प्रवर्तक सौ. स्मिता गालफाडे यांनी केले संस्थेची सदस्या कु. वैभवी पाटील हीने आपल्या खुमासदार शैलीत एकपात्री नाटिका सादर करुन तसेच लोककलावंत व शाहीर श्री. कार्तीक मेश्राम यांनी पोवाडया व्दारे वाहतुक नियमांबाबत उपस्थित नागरिकांना प्रबोधनाचे काम केले. पोलीस अधीक्षक विनीता साहु, अपर पोलीस अधीक्षक रश्मि नांदेडकर, महिला पोउपनिरीक्षक सौ. लांजेवार व महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी वाहन चालकांना राखी बांधुन वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे कार्यक्रमप्रसंगी त्रिमुर्ती चौकात पोलीस दलातर्फे रस्ते वाहतुक सुरक्षा, ध्वनी प्रदुषण, आगामी गणेशोत्सव, विविध प्रकारच्या गुन्हेगारी कृत्यांपासुन सावध राहाण्या बाबत अंमली पदार्थाचे दृष्परिणाम ई. बाबत प्रबोधनात्मक व सावधगिरीच्या सुचना देणारे बॅनरचे प्रदर्शन करण्यात आले.

पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहु यांनी देखील कार्यक्रमास उपस्थित जनसमुदायास वाहतुकीच्या नियमांचे पालन करुन पोलीसांना सहकार्य करण्याचे आवाहन आपल्या अध्यक्षनीय भाषणात केले. पोलीस निरीक्षक बी. आर. गाडे, वाहतुक नियंत्रण शाखा यांनी आभार प्रदर्शन करुन कार्यकमाचा समावेश केला.

07.8

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.